## जैविक कचरा घनकचऱ्यात टाकणाऱ्या

# तीन खाजगी रुग्णालयांना ४५ हजाराचा दंड

### दंड न भरल्यास शिफा हॉस्पीटलवर कारवाई करणार

**नांदेड, दि. २४** : रुग्णालयातील उपचारासाठी वापरल्यानंतर निकामी झालेले वैद्यकीय साहित्य मनपाच्या घनकचरा ऑटोरिक्षामध्ये टाकणाऱ्या चार खाजगी रुग्णालयांना आज गुरुवारी (दि. २४) रंगेहात पकडून यातील रुग्णालयाकडून प्रत्येकी १५ हजार याप्रमाणे असा एकूण ४५ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. शिवाजीनगर भागातील शिफा हॉस्पीटलने दंड भरण्यासाठी शुक्रवारी सकाळपर्यंतची मुदत मागितली असून त्यांनी दंड भरला नाही तर त्यांच्याविरुध्द जैविक कचरा अधिनियमांतर्गत गुन्हा नोंदविण्यात येणार आहे.

मनपाच्या वतीने जैविक कचऱ्याच्या संकलनासाठी ठेकेदारामार्फत स्वतंत्र व्यवस्था केलेली असतानाही या रुग्णालयांनी घनकचऱ्यात जैविक कचरा समाविष्ट करुन मानवी आरोग्याला धोका निर्माण होण्याचे काम केल्यामुळे ही कारवाई करण्यात आली. शहरातील काही रुग्णालयांकडून घनकचरा संकलीत करणाऱ्या ऑटोरिक्षामध्ये खाजगी रुग्णालयाच्या लोकांकडून जैविक कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावण्याऐवजी या ऑटोमध्ये टाकण्यात येत होते. स्वच्छता विभागाच्या सहाय्यक आयुक्त सौ. वसुधा फड यांना ही माहिती मिळाल्यानंतर त्यांच्यासह स्वच्छता निरीक्षक आर. एच. गंदमवाड, जिलानी पाशा, मोहम्मद मुख्तार, स्वच्छता विभागाचे रणजित पाटील यांच्या पथकाने शिवाजीनगरच्या वाडीया फॅक्टरी परिसरातील शिफा हॉस्पीटल, संजीवनी हॉस्पीटल, आश्विनी हॉस्पीटल तसेच वजीराबाद भागातील वाडेकर हॉस्पीटल या चार ठिकाणी पोहचून तेथे रुग्णालयाच्या कामगारांकडून मनपाच्या घनकचरा ऑटोमध्ये टाकलेल्या जैविक कचऱ्याचा पंचनामा केला. यावेळी प्रदुषण नियंत्रण मंडळाचे उपप्रादेशिक अधिकारी रविंद्र आंधळे यांच्यासह क्षेत्रिय अधिकारी विनोद पवळे, महेश चलवा यांची उपस्थिती होती.

जैविक कचऱ्यांची स्वतंत्र विल्हेवाट लावण्यासाठी मनपाने पूर्वीच कंत्राटदार नेमला असून सदर कचरा शास्त्रीय पध्दतीने विल्हेवाट करण्यासाठी जैविक कचऱ्याच्या स्वतंत्र गाडीला द्यावा, अशा सूचना मनपाने वारंवार शहरातील सर्व डॉक्टर तसेच रुग्णालयांना दिल्या होत्या. यापूर्वी वाडीया फॅक्टरी भागात मानवी अवयव आढळल्याने खाजगी रुग्णालयास एक हजार रुपये तर त्यानंतर स्वच्छता महामोहिमेत जैविक कचरा उघड्यावर फेकणाऱ्या डॉक्टरास पाच हजार रुपयांचा दंड आकारला होता. त्यानंतरही अनेक रुग्णालयांनी जैविक कचरा उघड्यावर अथवा मनपाच्या घनकचरा घंटागाडी किंवा ऑटोत टाकण्याचे काम सुरुच ठेवल्याचे निदर्शनास आल्याने ही कारवाई करण्यात आली.

शिवाजीनगर भागातील आश्विनी क्रिटीकल ॲण्ड हार्ट केअर, संजीवनी हॉस्पीटल, तर वजीराबाद भागातील वाडेकर हॉस्पीटल या तीन खाजगी रुग्णालयाच्या डॉक्टरांकडून प्रत्येकी १५ हजार रुपये याप्रमाणे एकूण दंड वसूल करण्यात आला आहे. शिफा हॉस्पीटलला देखील १५ हजार रुपयांचा दंड आकाराण्यात येणार आहे. शिफा हॉस्पीटलच्या डॉक्टरांनी दंड देण्यास प्रारंभी नकार दर्शविला होता. परंतु सायंकाळी त्याच्या प्रतिनिधींनी मनपा कार्यालयात येऊन उद्या शुक्रवारी सकाळपर्यंत दंडाची रक्कम भरण्याची हमी दिली. मुदतीत सदर दंड भरला नाही तर शिफा हॉस्पीटलविरुध्द गुन्हा नोंदविण्यात येईल, अशी माहिती सौ. फड यांनी दिली. जैविक कचरा उघड्यावर टाकणे मानवी जीवनासाठी हानीकारक असून नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेणाऱ्या डॉक्टर मंडळींनी या बाबीकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. यापूढे जैविक कचऱ्याची विल्हेवाट योग्य पध्दतीने लावून हा कचरा संबंधित ठेकेदाराच्या वाहनातच देण्यात यावा, अन्यथा दंडाच्या रक्कमेत आणखी वाढ करुन संबंधित रुग्णालयाच्या डॉक्टरांविरुध्द गुन्हे नोंदविण्यात येतील, असा इशारा मनपाच्या वतीने देण्यात आला आहे.